महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १७ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


लक्षवेधी

## ऐन दिवाळीत मुसळधार पाऊस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दिवाळी सणाला अवघे दोन ते तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये दिवाळी खरेदीचा उत्साह पाहायला मिळत आहे. परंतु, गुरुवारी सायंकाळी विजेच्या गडगडाटासह ठाणे शहरात सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांच्या उत्साहावर विरजण पडल्याचे दिसून आले. तसेच या पावसामुळे विक्रेत्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

दिवाळी निमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. कंदील, पणत्या, रांगोळी, कपडे, घर सजावटीच्या वस्तू, किल्ल्यांसाठी लागणारे मावळे अशा विविध वस्तू बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून देखील खरेदीवर मोठ्या सवलती देण्यात आल्या आहेत. अवघे दोन ते तीन दिवस दिवाळीला राहिले असल्यामुळे नागरिकांची दिवाळी साहित्य तसेच कपडे खरेदी करण्यासाठी लगबग सुरु आहे. यंदाच्या रविवारी ठाणे शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या जांभळीनाका बाजारात नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली होती. ठाणे शहरातील गोखले रोड, नौपाडा, गावदेवी परिसर, राम मारुती रोड, जांभळी नाका या परिसरात सध्या दररोज संध्याकाळी नागरिकांची खरेदीसाठी येत असतात. तर, काहीजण कामावरून घरी परतताना खरेदी करत असतो. रांगोळी, पणत्या, मावळे विक्री करणारे फेरीवाले यांचे या पावसामुळे मोठे नुकसान झाले. रांगोळी तसेच पणत्या पावसाच्या पाण्यात भिजल्यामुळे खराब झाल्या. तर, मावळे देखील पाण्यात भिजून त्यांचा रंग उडाला. तसेच फेरीवाल्या विक्रेत्यांचेही या पावसामुळे नुकसान झाले. या पावसामुळे ग्राहकांचा हिरमोड झालाच परंतू, विक्रेते तसेच व्यापाऱ्यांनाही याचा चांगलाच फटका बसला.

### उल्हासनगरात स्वीगी बाईकर्सचा संप ऑनलाईन फूड सेवा ठप्प

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : ऑर्डर दिली पण डिलेव्हरीच नाही! कारण उल्हासनगरात फूड डिलेव्हरी सेवा ठप्प झाल आहे. स्वीगी बाईकर्सनी कंपनीच्या जाचक अटी आणि दरकपाती विरोधात संप पुकारला असून, मनसेच्या पाठिंब्यामुळे या आंदोलनाला आता अधिक जोर आला आहे. ऑनलाईन सुविधांच्या सवयी झालेल्या ग्राहकांना मात्र आता 'डिजिटल उपवास' करण्याची वेळ आली आहे.

आधुनिक जीवनात स्वीगी, झोमॅटो सारख्या ऑनलाईन सेवांनी लोकांच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग घेतला आहे. घरबसल्या काही मिनिटांत गरमागरम जेवण किंवा किराणा मिळविण्याची सवय आता सर्वांनाच लागली आहे. पण हाच दिलासा देणारा डिजिटल सोयीचा धागा उल्हासनगरात अचानक तुटला आहे. उल्हासनगर शहरातील बिग सिनेमा परिसरातील सुमारे ३० ते ३५ स्वीगी डिलेव्हरी बाईकर्सनी कंपनीच्य अन्यायकारक धोरणांविरोधात संप पुकारला असून, परिणामी संपूर्ण शहरात स्वीगीची सेवा ठप्प झाली आहे.

# 'अब की बार ७० पार'

## ठाण्यात भाजपचा स्वबळाचा नारा ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे.

अशातच पालिका निवडणुका महायुतीत लढवाव्यात, असा वरिष्ठ नेत्यांचा सूर असताना, स्थानिक पातळीवर मात्र, स्वबळाचा नारा दिला जात आहे. भाजपने पालिका निवडणूक लढण्यासाठी इच्छूक कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात कार्यकर्त्यांनी स्वबळाचा नारा देत 'अब की बार ७० पार' ची घोषणा दिली-यामुळे भाजपने ठाणे पालिका निवडणुकीत एकाला चलो रेचा नारा दिला आहे. तर, दुसरीकडे ठाण्यातील आनंद आश्रम येथे शिंदे सेनेच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या पार पडलेल्या बैठकीत भाजपविरोधात नाराजीचा सूर लावला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीकडून स्थानिक पातळीवरील पदाधिकारी व नेत्यांकडून आढावा घेतला जात असून निवडणुकीची पुढील दिशा ठरविण्यात येत आहे. अशातच महायुतीतील मित्र पक्षांमध्येच चढाओढ लागल्याचे दिसून येत आहे. त्यात ठाण्यातील आनंद आश्रम येथे शिंदेच्या शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीत बुधवारी माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक आणि पूर्वतयारीसंदर्भात महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीमधील भाजपबाबत नाराजीचा सूर उमटला. ठाण्यात शिवसेनेच्या माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांकडून होत असलेल्या विकासकामांमध्ये भाजपचे काही पदाधिकारी अडथळे आणत असल्याच्या तक्रारी नगरसेवकांनी व्यक्त केल्या. अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी आगामी ठाणे महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची मागणी बैठकीत केली. दुसरीकडे, ठाणे भाजपकडून गुरुवारी (ता. १६) इच्छुक उमेदवारांच्या मार्गदर्शन शिबिरात पक्षाने आगामी निवडणुकीसाठीची ताकद दाखवली. ठाणे शहरातील १८ मंडळांतून तब्बल ४१६ इच्छूक उमेदवारांनी या शिबिरात सहभाग नोंदवला. या शिबिरात आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, शहराध्यक्ष संदीप लेले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यात उमेदवारांना संघटन, प्रचारतंत्र आणि मतदारांशी संवाद साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या माध्यमातून ठाणे भाजपने स्वबळाची तयारी सुरु केल्याची चर्चा असतानाच, कार्यकर्त्यांनी स्वबळाचा नारा देत अब की बार ७० पारची घोषणा दिली. दरम्यान, दोन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून ठाणे पालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची मागणी होत असल्याचे दिसून येत असून यावर वरिष्ठ काय भुमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**यंदाच्या निवडणुकीतील सर्वच जागांवर कामाला लागण्याच्या सूचना दिल्या असून ठाणे पालिकेत महापौर भाजपचा बसावा अशी कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन शिबिरात व्यक्त केली आहे. या शिबिरात ४५० इच्छुकांनी परिचय पत्र सादर केली आहेत.**
**- संजय केळकर, आमदार, भाजप**

**आजची बैठक ही संघटनात्मक असून बूथ पातळीवर कशा पद्धतीने काम करावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांना विचारले असता, कार्यकर्त्यांनी यंदा ७० पारचा नारा दिला. असे असले तरी, वरिष्ठ जो निर्णय घेतील तो अंतिम असेल.**
**- निरंजन डावखरे, आमदार, भाजपा.**

# बारवी धरण ग्रस्तांची दिवाळी गोड

**भूसंपादनाच्या व्याजाच्या रकमेच्या धनादेशाचे आमदार कथोरेंच्या हस्ते वाटप**




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : बारवी धरणग्रस्तांच्या भूसंपादनाच्या रकमेच्या व्याजाचे धनादेशाचे वाटप आज मुरबाड एम.आय. डी. सी. सभागृह मुरबाड येथे आमदार किसन कथोरेंच्या हस्ते करण्यात आले.उपविभागीय अधिकारी कार्यालय कल्याण व मुरबाड तहसील यांच्या वतिने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे प्रांताधिकारी विश्वास गुजर यांनी सांगितले. धरणग्रस्तांची दिवाळी गोड होण्यासाठी तातडीने 34 शेतकऱ्यांना आज आमदार कथोरेंच्या हस्ते वाटप करण्यात आले असून शासन आपल्या दारी हा उपक्रम घेण्यात आला असून काही खातेदार मयत आहेत त्यांचे पेपर लवकरात लवकर जमा करावे अशा प्रकारच्या सूचना प्रांताधिकारी गुजर यांनी केल्या असून यासाठी आमदार कथोरे साहेबांनी शासन दरबारीं प्रयन्त केले असल्यामुळे हे शक्य झाले असल्याचे सांगितले.

तर आमदार कथोरे यांनी मार्गदर्शन करताना संपुर्ण राज्यात असे पुनर्वसन कुठे झाले नाही. 1209 तरूणांना नोकर्या देण्याचे महत्वाचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असून उर्वरित नोकर्याचे व कान्होळ ग्रामस्थांचे प्रश्न ही लवकरच मार्गी लागतील असे आश्वासन कान्होळ व इतर बारवी धरणग्रस्तांना यावेळी दिले.तर प्रस्तावित बारवी धरण पुनर्वसना प्रमाणे काळू मधील शेतकऱ्यांना लाभ व पुनर्वसन होणार असेल तरच काळू धरणाला मंजुरी देऊ असे सुचक वक्तव्य यावेळी आमदार कथोरे यांनी केले.

उर्वरित सर्व बारवी प्रकल्प लाभार्थींनी येत्या दोन दिवसात आपले अपेक्षित पेपर मुरबाड तहसिल येथे जमा करावे असे आवाहन तहसीलदार अभिजित देशमुख यांनी करून उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नायब तहसीलदार अमोल शिंदे यांनी केले.या कार्यक्रमासाठी भाजपा पुर्व मंडळाचे तालुका अध्यक्ष दिपक पवार,युवा नेते अनिल घरत, माजी नगराध्यक्ष मोहन सासे, अडव्होकेट सचिन चौधरी, भाजपा कार्यकर्ते संतोष भांगरथ, बंडूशेठ गायकर यांच्यासह बारवी प्रकल्पग्रस्त व महसूल कर्मचारी उपस्थित होते.

# ठाण्यातील सर्व ग्रामपंचायती होणार डिजिटल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सध्याचे युग डिजिटल झाले असून, आता जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयेही डिजिटल मार्गावर येणार आहेत. ठाणे जिल्हा परिषदेने प्रशासनातील पारदर्शकता आणि कामकाजातील वेग वाढवण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यातील सर्व ४३१ ग्रामपंचायतींना डिजिटल स्वरूप देण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीचे स्वतंत्र संकेतस्थळ (Website) तयार करण्यात येणार असून, नागरिकांना आपल्या गावाची सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

या संकेतस्थळावर सरपंच, उपसरपंच व सदस्यांची माहिती, ग्रामपंचायतीचा दैनंदिन कारभार, शासनाच्या विविध योजना, मालमत्ता कर, पाणीपट्टी, जमा-खर्चाचा तपशील, स्वामित्व मालमत्ता कार्ड, नमुना ८ आदी सर्व माहिती पाहता येईल. यामुळे ग्रामपंचायतींच्या कारभारात पारदर्शकता वाढून नागरिकांना सोयीस्कर आणि सुलभ सेवा मिळणार आहेत.

### ४३१ ग्रामपंचायतींसाठी स्वतंत्र संकेतस्थळांची निर्मिती

ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर माहिती कशी अपलोड करावी, तसेच संकेतस्थळाचे संचालन कसे करावे, याचे प्रशिक्षण संबंधित कर्मचाऱ्यांना दिले जात आहे. पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्यानंतर ही संकेतस्थळे प्रत्यक्ष कार्यान्वित केली जाणार आहेत. **- प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

## उल्हासनगरात दिवाळीपूर्वी रस्त्यांची डागडुजी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - दिवाळीपूर्वी शहरातील रस्ते चकाचक व सुसाट होण्यासाठी दिवस-रात्र रस्ता दुरस्तीचे काम बांधकाम विभागाकडून होत आहे. रस्ता दुरस्तीच्या निधीबाबत शहर अभियंता निलेश शिरसाठे बोलण्यास तयार नसल्याने, रस्ता दूरस्ती व निधी बाबत साशंकता निर्माण झाली. उल्हासनगरात बहुतांश रस्त्याची दुरावस्था झाली असून नागरिक व वाहन चालक त्रस्त झाले. गणेशउत्सव व नवरात्रीउत्सव दरम्यान सतंतधार पाऊस असल्याने, रस्ता दूरस्तीला अडथळा निर्माण झाला. तसेच रस्ते दूरस्तीवर चौफर टिका झाली. गेल्या आठवड्यात आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी रस्ता व चौकाची पाहणी करून रस्ता दुरस्तीचे संकेत दिले होते. दरम्यान महापालिका बांधकाम विभागाने दिवाळीपूर्वी रस्ता दूरस्ती सुरू केली. काजल पेट्रोल पंप ते विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन रस्ता, नेताजी गार्डन परिसर रस्ता, फॉरवर्ड लाईन ते नेहरू चौक रस्ता आदी अनेक रस्ते दुरस्तीचे काम रात्र दिवस सुरू आहे. राजकीय नेते रस्ता दूरस्ती ठिकाणी उभे राहून शेल्फी काढून कामाचे श्रेय घेण्यासाठी सोशल माध्यमावर फोटो व्हायरल करीत आहेत.

## शिंदे गटाच्या बैठकीत स्वबळाचा नारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाण्यातील आनंद आश्रम येथे शिंदे सेनेच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक आणि पूर्वतयारीसंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीमधील भाजपबाबत नाराजीचा सूर उमटला. ठाण्यात शिवसेनेच्या माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांकडून होत असलेल्या विकासकामांमध्ये भाजपचे काही पदाधिकारी अडथळे आणत असल्याच्या तक्रारी नगरसेवकांनी व्यक्त केल्या. अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी आगामी ठाणे महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची मागणी बैठकीत केली. भाजप विरोधात नाराजीचा सूर लावला असून, पालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची मागणी बैठकीत केली.ठाणे महापालिकेच्या निवडणुकांची तयारी दोन्ही प्रमुख पक्षांनी वेगात सुरू केली असतानाच महायुतीतील भाजप व शिंदे गट यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत असल्याचे दिसून येत आहे. भाजपकडून गुरुवारी (ता. १६) निवडणूक इच्छुकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन शिबिरामुळे स्वबळाची चाचपणी सुरू झाल्याची चर्चा रंगत असतानाच, ठाण्यातील आनंद आश्रम येथे शिंदेच्या शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीत बुधवारी (ता. १५) माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीमधील भाजपबाबत नाराजीचा सूर उमटला. या बैठकीत अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. विकासकामांमध्ये भाजपचे काही स्थानिक पदाधिकारी अडथळे निर्माण करत असल्याच्या तक्रारी या वेळी करण्यात आल्या. त्यामुळे निवडणूक स्वबळावर लढवण्याचा सूर बैठकीतून उमटला. शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत उपस्थित राहून कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, तसेच संघटना मजबूत ठेवण्याचे आवाहन केले.









## कोकण विभागाच्या उपसंचालक अर्चना शंभरकर अनंतात विलीन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे:** महासंचालनालयाच्या पालघर जिल्हा माहिती अधिकारी तथा कोकण विभागाच्या प्रभारी उपसंचालक प्रसिद्ध लेखिका अर्चना गाडेकर शंभरकर यांचे दीर्घ आजाराने बुधवारी निधन झाले. त्या ५२ वर्षाच्या होत्या.

त्यांच्या पश्चात पती प्रकाश शंभरकर, मुले डॉ.अप्रतिम व रीची शंभरकर, वडील भगवान गाडेकर,भाऊ डॉ. हेमंत गाडेकर, भाऊ अभिनेता जयंत गाडेकर, बहिण डॉ. मोना व बराच मोठा आप्तपरिवार आहे. दिनांक १६ ऑक्टोबर रोजी १०१, वसुंधरा सीएचएस, युगंधरा टॉवर, खारघर सेक्टर ८ खारघर स्टेशन रोड लिटल वर्ल्ड जवळ, नवी मुंबई या त्यांच्या निवासस्थानी त्यांचे पार्थिव दुपारी १२ वाजता पासून अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले . दुपारी दोन वाजता नंतर खारघर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अर्चना शंभरकर या प्रसिद्ध लेखिका होत्या. त्यांची 'सोलमेट' ही कादंबरी तर 'सारीनास' हा लघुकथा संग्रह प्रसिद्ध झाला होता. विदर्भातील सुप्रसिद्ध कवियित्री दिवंगत विमल गडेकर यांच्या त्या ज्येष्ठ कन्या होत्या.त्या मूळच्या चंद्रपूर येथील रहिवासी होत्या.



### सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या
# ठाणे जिल्हा अध्यक्षपदी चंद्रकांत गुंजेगावकर यांची निवड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या ठाणे जिल्हा सभेत महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त कडोंमपा शाळा क्र.१९,नेतिवली शाळेचे माजी मुख्याध्यापक तसेच माजी सचिव - ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे चंद्रकांत गुंजेगावकर यांची ठाणे जिल्हा अध्यक्षपदी राज्य अध्यक्ष मधुकर जंगम यांनी सर्वानुमते निवड केली आहे. या निवडीबद्दल गुंजेगावकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव होत असल्याचे सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यकारिणी निवडीत जिल्हा नेते मेघराज घरत, जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत गुंजेगावकर, कार्याध्यक्ष शंकर भोईर, कोषाध्यक्ष लता पाटील, सरचिटणीस शुभदा कर्वे, जिल्हा संघटक अनिल भोईर, त्याचबरोबर प्रभाकर पाटील, विजय परदेशी, विलास जाधव, अशोक मुक्ता, रजनी धोंगडे, मोनिका लवंगडे, रामदास पाटील, सुमित्रा जाधव, सविता घरत, हेमलता पितळे, गीता दळवी आणि सुनिता मोहिते हे उपस्थित होते. या निवडीबद्दल राज्य अध्यक्ष मधुकर जंगम यांनी अभिनंदन केले असून जिल्हा नेते मेघराज घरत यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.




आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. वसुबारस हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तूतः हा सण वेगळा आहे. सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून या सणाविषयी तसेच यानिमित्ताने गोपालनाचे महत्त्व थोडक्यात जाणून घेऊया.

**वसुबारस (गोवत्स द्वादशी)**

श्री विष्णूच्या आपतत्त्वात्मक लहरी कार्यरत होऊन ब्रह्मांडात येण्याचा दिवस म्हणजे वसुबारस ! या दिवशी विष्णुलोकातील वासवदत्ता नामक कामधेनु या लहरींचे वहन ब्रह्मांडापर्यंत करण्यासाठी अविरत कार्य करते. या दिवशी या कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशी वृंदावनाशी धेनु म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतिकात्मक रूपात पूजन केले जाते.

या दिवशी आपल्या अंगणातील गाईला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस असे म्हणतात. बारस म्हणजे एखाद्या गोष्टीत नवीन चैतन्यबीजाची निर्मिती होणे. हेच देवत्व तिच्या ठायी कायमस्वरूपी विष्णूरूप पाहून जिवाने टिकवायचे असते आणि तिच्यातून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यलहरींचा लाभ उठवायचा असतो.

**इतिहास :** समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.

**उद्देश** : या व पुढील अनेक जन्मांतील कामना पूर्ण व्हाव्यात आणि पूजा करत असलेल्या गायीच्या शरीरावर जितके केस आहेत, तितकी वर्षे स्वर्गात रहायला मिळावे.

**सण साजरा करण्याची पद्धत :**

या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात.

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची

**पूजा करावी का ?**
**पूजा करणे शक्य नसल्यास काय करावे ? :**

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करण्यास अडचण असेल, तेव्हा घरी एखादी गायीची मूर्ती असल्यास तिची पूजा करावी. घरी मूर्ती नसल्यास गायीचे पाटावर चित्र काढून त्याची पूजा करावी.

**गोपालनाचे महत्त्व !** : पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांच्या आधाराने सृष्टीची निर्मिती झाली आणि तिचे चलनवलनही चालू आहे. या पंचमहाभूतांची गाय ही माता आहे. काळाच्या ओघात तिचीच अवहेलना झाल्याने आज सर्वतऱ्हेचे प्रदूषण गंभीररित्या वाढले आहे. हे वेळीच रोखायचे असेल, तर गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन याला पर्याय नाही. एकप्रकारे गोमाता पंचमहाभूतांच्या कुपोषणाची अधिकारिणी आहे. वसुबारस या सणाच्या निमित्ताने गोमातेचे महत्त्व लक्षात घेऊन गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करूया.

**गुरुद्वादशी** : आश्विन वद्य द्वादशी या तिथीला शिष्य गुरूंचे पूजन करतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण साजरे करण्याच्या पद्धती'**
**संपर्क : 9819242733**

# महिलांच्या आर्थिक साक्षरतेसाठी सरसावली अंबरनाथ शिवसेना

### माजी नगरसेवक संदिप भराडेंचा पुढाकार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : आर्थिक दुर्बल घटकातील आणि अल्प शिक्षित महिलांना आर्थिक व्यवहारां बद्दल फारशी सजकता नसते. अशा महिलांना अनेक शासकीय योजनांची माहिती मिळावी, व्यवहार करता यावे यासाठी आर्थिक साक्षरतेचे धडे अंबरनाथ शिवसेनेच्या माध्यमातून महिलांना देण्यात आले. अंबरनाथ पश्चिमेकडील , साईबाबा चौक, नवीन भेंडीपाडा, घाडगे नगर समाजमंदिरात हे महिला आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन माजी नगरसेवक एडवोकेट संदीप भराडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

प्रभागातील गरीब व गरजू महिलांकरता सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, ई-श्रम कार्डचे फायदे, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, बचत व गुंतवणुकीचे महत्व, स्वयंरोजगार निर्मितीसाठी आवश्यक कागदपत्रे, पैसे वाढवण्यासाठी SIP आणि मॅच्युअल फंडचे महत्व. रेशनिंग विषयक समस्या व समाधान अशा व इतर अनेक कल्याणकारी योजनांचे माजी विभागीय संचालक, श्रम व रोजगार मंत्रालय प्रदीप मुन यांनी मार्गदर्शन यावेळी केले. माजी नगराध्यक्ष मनीषा वाळेकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. तर याकामी शहर प्रमुख अरविंद वाळेकर यांच्या नेतृत्वाखाली, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र वाळेकर व निखिल वाळेकर यांचे मार्गदर्शन लाभले .

यावेळी कल्याण पश्चिमेतील शेकडो महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

हे शिबिर यशस्वी करण्याकरिता बाळू शिंदे, राजू पाटील, योगेश गोरे , रेखा शिंदे, सुवर्णा कोरडे, ममता जाधव ,सुषमा भाकरे, अरुणा पुजारी ,रेणुका दिनकर, वैशाली लोंढे ,हर्षाली इंगळे, सारिका उत्तेकर, रुकसार शेख, सुषमा पुजारी यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक संघटना आणि शिक्षणाधिकारी यांच्यात होणार सहविचार सभा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : संघटनांबरोबर शिक्षणाधिकारी यांच्या सहविचार सभा पुर्वीप्रमाणे होत नसल्याने गुंतागुंतीचे विषय प्रलंबित राहतात. असे प्रस्ताव चर्चेतून सुटावेत यासाठी वर्षांतून किमान चार वेळा सहविचार सभा घ्याव्यात अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी देविदास महाजन यांच्याकडे केली असता ती मान्य करण्यात आली.

थॉमसकिशोर शिनगारे यांच्या पदवीधर वेतनश्रेणीच्या मान्यतेसाठी शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी कार्यालय, ठाणे येथे दि.16 आक्टोबर 2025 रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले होत. यावेळी शालेय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अन्याय होऊ नये याकरीता वेळोवेळी शाळा तपासणी व्हावी असे संघटनेचे राजेंद्र गवळी यांनी सूचविले. दि. १३ ऑक्टोबर २०१६ चा शासन निर्णय डावलून थॅामसकिशोर शिनगारे व सुधाकर महाजन यांच्याप्रमाणे अन्य शाळांतील शिक्षकांवरही अन्याय होत असावा अशी शक्यता शिक्षणाधिकारी यांनीच व्यक्त केल्यामुळे अशाप्रकारच्या प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश कार्यालयाकडून दिले जातील असेही सांगण्यात आले.

सेवाज्येष्ठता, पदोन्नती मान्यता, अल्पसंख्याक शाळांमधील भरतीसाठी नाहरकत दाखले, स्वाक्षरी अधिकार, बदली मान्यता, अतिरिक्त शिक्षकेत्तर समायोजन अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. २८ जानेवारी २०२५ च्या शासन परिपत्रकाचा सखोल अभ्यास करून कुणावरही अन्याय होणार नाही यासाठी सुनावणी घेऊन पडताळणी करूनच पदोन्नतीस मान्यता द्याव्यात असा आग्रह सुधीर घागस यांनी धरला. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी येणाऱ्या अभ्यागतांशी सौजन्याने बोलण्याच्या सूचना शिक्षणाधिकारी यांनी संबंधितांना द्याव्यात असे किशोर राठोड यांनी शिक्षणाधिकारी यांना सांगितले.

यावेळी संघटनेच्या वतीने संदीप कालेकर, ज्ञानेश्वर गोसावी, राजेंद्र गवळी, किशोर राठोड, थॅामस शिनगारे, अनिल मुरादे, पदमाकर पाचपांडे, ज्ञानेश्वर चाचरे, सुधाकर महाजन आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर कार्यालय अधीक्षक विजयकुमार सोनवणे व प्रशांत कसबे उपस्थित होते. आजच चौकशीचे आदेश काढून व थॅामस शिनगारे यांच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करून निर्णय देण्यात येईल या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंध्ये यांनी दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशिंद** --- ठाणे -पालघर जिहा महाराष्ट्रीय वैश्य समाज संघाच्या कार्य शेत्रातील गटांना वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंधे व त्यांच्या सहकारी सदश्यांनी गटागटातील समाज बांधवांच्या भेटी घेऊन दिवाळी सणाच्या व दिवाळी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी समन्वय समिती प्रमूख दिलीप भोपतराव यांची खास उपस्थिती होती.

ठाणे-पालघर जिल्हा महाराष्ट्रीय वैश्य समाज संघटनेचा कारभार 24 गटात कार्यरत आहे. या समाज संघायावतीने अनेक उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून अध्यक्ष स्वता गटागटात जाऊन समाज बांधवांच्या भेटी घेऊन त्यांच्यावरोबर अडीअडचणी संदर्भात चर्चा करतात. निराश्रीत वैश्य समाज बांधवानांही निराश्रीत समीतीचे सभापती पांडुरंग बिडवी यांना समवेत भेट घेऊन दिवाळी भेट दिली.या वेळी समाजाच्या वतिने गेली 50 वर्ष सलगपणे सुरू असलेल्या संस्कार शिबीराचे निमंत्रणही समाज बांधवांना दिले. यावेळी समन्वय समिती प्रमुख दिलीप भोपतराव, उपाध्यक्ष प्रितेश जगे, विश्वस्त गणेश पाठारी, उपाध्य निलेश कोंडलेकर,माजी अध्यक्ष विजय निकते माजी समन्वय समिती प्रमुख व विद्यमान सल्लागार नंदकिशोर मलबारी.,दिपक जगे उपस्थित होते. हे शिबीर रविवार दि. 26 ते बुधवार दि. 29 आक्टोबर या कालावधीत संपन्न होणार आहेत. हे शिबीर निवासी असणार आहे. या शिबीरात प्रार्थना, योगासने, विविध सांघिक खेळ, गायन, कथा, हॅर्स रायडींग, रायफल शुटिंग, स्वावलंबन, सहासी खेळ, आदिचा शामावेश असणार आहे. घोडे स्वारीचे प्रशिक्षण नंदकुमार दलाल देणार आहेत. हे शिबीर गोवेली येथे सुभेदार फॉंर्म हाऊस येथे संपन्न होणार आहे. बुधवार दि. 29 ऑक्टोंबर रोजी या शिबिराचा समारोप दुपारी 2 वाजता होणार आहे. या शिबिरात सात ते 13 वयोगटातील मुलं मुली सहभागी होणार आहेत. या शिबिरासाठी मोठ्या संख्येने आपल्या मुलांना पाठवावे असे आव्हान संस्कार समितीचे सभापती समीर दलाल यांनी केले आहे.

# अखिल पेण तालुका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची सभा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : अखिल पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची त्रैमासिक सभा १३ ऑक्टोबर रोजी शिक्षक पतपेढी पेण याठिकाणी संपन्न झाली.

प्रथम श्रीगणेशाचे पूजन व कै.श.हि पाटील संघटनेचे संस्थापक यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी पूजन केले.श्रीमती उत्तरा पाटील यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सुस्वरात गायन केले. सूत्रसंचलन श्रीमती भारती म्हात्रे यांनी केले.

सभेचे अध्यक्षस्थानी बा.ल. म्हात्रे हे होते .सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष कै.ग.वि. म्हात्रे व इतर सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.प्रास्ताविकात जिल्हा सरचिटणीस गुरूनाथ पाटील यांनी संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी कार्यक्रम विषयी माहिती दिली व प्रलंबीत प्रश्नांवर चर्चा केली.तालुका अध्यक्ष राजाराम शिवराम गावंड यांनी तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तालुका कार्यकारिणी व जिल्हा कार्यकारिणी प्रयत्नशील असल्याचे सांगितले तर जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील यांनी पेन्शन, गटविमा, फंड, वरिष्ठ वेतनश्रेणी, निवड श्रेणी या विषयी सखोल चर्चा केली. अनेक शिक्षकांनी आपल्या समस्या व विचार मांडले. तर बा.ल. म्हात्रे यांनी अध्यक्षस्थानावरून आपले सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या समस्या यावर विचार मांडून सेवानिवृत्त शिक्षकांच्या समस्या संघटनेच्या माध्यमातून प्रामाणिक काम करुन सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे सांगितले.शेवटी प्रदीप म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपली असे जाहीर केले.

सभा यशस्वी करण्यासाठी पांडुरंग अंबू म्हात्रे, मुरलीधर म्हात्रे, विश्वनाथ कोठेकर अरविंद चव्हाण, सतिश नवाळे, श्रीमती उत्तरा पाटील, श्रीमती अलका मोकल, श्रीमती सीमा सुर्वे, श्रीमती आशा म्हात्रे आदिनी भरपूर मेहनत घेतली

# कै.मो.सु.पिसाळ विद्यालय नूतन इमारत भुमिपूजन सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**शहापूर ग्रामीण** : श्री साईकृपा कै.मो. सु.पिसाळ विद्यालय, जांभूळ या विद्यालयाच्या नूतन इमारत बांधकाम भुमी पूजन सोहळा संपन्न झाला.

जयदेवी भवानी महिला मंडळ संचलित श्री साईकृपा कै.मो.सु.पिसाळ विद्यालयात 8 वी ते 10 वी पर्यंत जवळपास 104 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सदर, संस्थेची व विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण लक्षात घेता, रोष डायग्नोस्टिक इंडिया प्रा.लि. तसेच सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने नवीन इमारत बांधकाम हाती घेण्यात आले आहे. या होणाऱ्या नूतन इमारतीच्या बांधकामाचे भुमिपूजन नुकतेच करण्यात आले. सदर, इमारत बांधकामसाठी महेश सूर्याजीराव पिसाळ व उमा महेश पिसाळ यांनी स्वतः मालकीची 15 गुंठे जागा संस्थेला दान दिली आहे.

या इमारत भूमीपूजनाचे रोष डायग्नोस्टिक इंडिया प्रा.लि.कंपनीचे अधिकारी अमरेंद्र पी. मालशे, सेवा सहयोग फाउंडेशनचे संचालक किशोरजी मोघे, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक दिपालीताई देवळे, रामदादा रोकडे, राजेश मोरे यांच्या हस्ते पार पडले तर याप्रसंगी जयदेवी भवानी महिला मंडळाच्या संस्थाध्यक्षा संयोगिता पानसरे, संस्था पदाधिकारी नेहा पवार, उमा पिसाळ, मिनल पिसाळ, तेजस पिसाळ, राजेश पिसाळ, इमारत बांधकाम व्यावसायिक संदीप पवार आदीजण उपस्थित होते.

दरम्यान, या होणाऱ्या नूतन व सर्व सोयी-सुविधा युक्त अशा सुसज्य इमारतीमुळे विद्यार्थ्यांना विविधपर शैक्षणिक कार्यास मदत होणार असल्याचे शालेय शिक्षण संस्था व शालेय व्यवस्थापन यांनी म्हटले आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in







**मेष**
तुमच्याकडे दिवसभर भरपूर ऊर्जा असेल आणि तुम्ही प्रतिकूल परिस्थितीतही समस्या सोडवू शकाल. आज उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये वाढ होईल.

**वृषभ**
आपले ध्येय साध्य करण्यासाठी लक्ष केंद्रित करू शकता. वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित काही प्रलंबित प्रकरण सोडवण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन**
दिवस चांगला आहे. काही खास लोकांकडूनही तुम्हाला सहकार्य मिळेल. थोडी काळजी आणि आत्मविश्वासाने, बहुतेक कामे सुरळीतपणे पूर्ण होतील.

**कर्क**
आज तुम्ही सामाजिक कार्यात नक्कीच हातभार लावाल, यामुळे तुमचे संपर्क वर्तुळ वाढेल. आणि त्याच वेळी, ध्येयाकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित कराल.

**सिंह**
धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आमंत्रणही मिळेल. जमीन किंवा मालमत्तेशी संबंधित प्रकर सोडवले जाऊ शकते.

**कन्या**
जर कुठेतरी उधार दिले असेल किंवा अडकले असेल तर ते परत मिळण्याची शक्यता आहे.नात्यातील खराब संबंध सुधारण्यात तुमची भूमिका असेल.

**तूळ**
घरातील काही कामात व्यस्त राहिल्याने तुम्हाला थकवा येईल, परंतु तुमच्या मेहनतीचे अपेक्षित परिणाम मिळाल्याने तुम्हाला आराम मिळेल.

**वृश्चिक**
आर्थिक बाबतीत आजचा दिवस फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज काही अडथळे येतील, पण मित्र आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने समस्या सुटतील.

**धनु**
एखाद्या गोष्टीबाबत तुमच्या मनात काही नकारात्मक विचार येत असतील तर तुम्ही त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न कराल .यशस्वीही व्हाल.

**मकर**
यशस्वीही व्हाल.व्यवसायातील जबाबदारी पार पाडण्यासाठी खूप मेहनत करावी लागेल.मालमत्तेशी संबंधित कोणतीही समस्या सुरू असेल .

**कुंभ**
तुम्हाला एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळेल, परस्पर संवादातून आनंदही मिळेल. नाती जपतील.काही काम पूर्ण होतील.

**मीन**
नवीन कामाशी संबंधित कोणतीही योजना बनवण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे.खर्चात सुसूत्रता आणल्यास आर्थिक स्थितीत स्थैर्य येईल.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# कचराभूमीचा प्रश्न बनला गंभीर

## शत्रुघ्न भोईर यांचा आंदोलनाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 1 उंबर्डे गाव परिसरात असलेल्या डंपीग ग्राउंडमधील कचऱ्याच्या घाणीचे त्रास होत असुन उंबर्डेगाव, हिऱ्याचा पाडा, कोळीवली, गांधारी परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याचप्रमाणे या प्रभागात रस्त्यांची दुरावस्था असून काही गावांना स्मशानभूमी देखील नाही. याबाबत महापालिका प्रशासनाने दखल घेऊन योग्य ती चौकशी करून याबाबत लवकर काम सुरु करावे अन्यथा दिवाळी नंतर ग्रामस्थ आंदोलन करतील असा इशारा भारतीय जनता पार्टी ओबीसी सेल कल्याण शहर अध्यक्ष शत्रुघ्न भोईर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.



याबाबत माहिती देतांना शत्रुघ्न भोईर यांनी सांगितले की उंबर्डे येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पात कचऱ्याचा ढिगारा साचला आहे. तसेच बाहेरच्या बाजूला हि कचरा पडतो त्यामुळे भात शेतीवर परिणाम होतो. तसेच कचऱ्याचे काळे पाणी, केमिकल मिश्रीत पाणी जनावरे पितात त्यामुळे त्याचा जीव धोक्यात आला आहे. तर काही जनावरांचा मृत्यू देखील झाला आहे. नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे. संध्याकाळी खिडकी व दरवाजा बंद केल्याशिवाय घरातील जेवण करू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच आधारवाडी जेल रोड रस्ता हा डि पी प्रमाणे 24 मीटर असतांनाच फक्त सहा मीटर रुंदीचा बनविला आहे, त्यामुळे वाहतूक कोंडी होते. तसेच वाडेघर ते सापाड गाव 15 व 18 मीटर रुंदीकरण गेले अनेक वर्षे रखडले आहे. या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे. कोळीवली, गांधारी, हिऱ्याचा पाडा परिसरात स्मशानभूमी नसल्याने अंत्यविधी उघड्यावर करावी लागते. सापाड येथे स्मशानभूमी आहे परंतु दुरावस्था झाली आहे. लाईट नाही, पाणी, सुविधा नाही टुव्हिलर गाडीची लाईट लावून अंत्यविधी करावा लागतो. महापालिकेत गावे असुनही काही उपयोग नाही सोयी सुविधा पासून वंचित राहवे लागते. महापालिका प्रशासनाने या समस्यांची दखल घेऊन पुढील कार्यवाही करावी अन्यथा दिवाळी नंतर ग्रामस्थ जन आंदोलन करतील असा इशारा भाजपाच्या शत्रुघ्न भोईर यांनी दिला आहे.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**-नोटीस -**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. विद्या समरसिंग गोळे, श्रीम. विद्या एस. गोळे व इतर, कु.मु.प.धा. श्रीम. विद्या एस. गोळे | सि.टी.एस.नं. ३००६/६, सेक्टर-१, मौजे-कल्याण | ०७ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात.

मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/५९०
दिनांक :- १६/१०/२०२५

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

### Education Department

Main Building, 3rd Floor, Near Chopda Court,Ulhasangar-421003

**E-Tender**

**NOTICE INVITING BIDS**

The Administrative officer, UMC Education Department on behalf of Municipal Commissioner, UMC intends to Redevelopment of School No.25, Ulhasnagar-3. The details are as listed below :-

| Sr. No. | Bid No | Bid Form Cost |
|---|---|---|
| 1 | UMC/ PWD/08/2025-26 | Rs. 2000 + 360 (GST 18%) = Rs. 2360/- |

Interested bidders who intend to bid can download bid forms from Government of Maharashtra E-Biding portal https://mahatenders.gov.in.

signature
Administrative Officer
Education Department
Ulhasnagar Municipal Corporation

जा.क्र. उमपा/पीआरओ/339/2025
दिनांक: १६/१०/२०२५

# कल्याणमध्ये रांगोळी महोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : विविधांगी रांगोळ्यांचे आविष्कार दिवाळीच्या सणामध्ये रंग भरण्याचे काम करतात. रंगोळीची ही कला आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही टिकून रहावी, नवीन पिढीला या कलेची महती कळावी, या उद्देशाने कल्याणच्या सुभेदारवाडा कट्टा यंदा 'रांगोळी महोत्सवा'चे आयोजन करत आहे.

या महोत्सवात रांगोळी स्पर्धा व प्रदर्शन भरविण्यात येणार असून, महिला, मुलींसह कलाकारांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. हा महोत्सव शनिवार, १८ ऑक्टोबर ते सोमवार, २० ऑक्टोबर दरम्यान सायंकाळी ५ ते रात्री ८.३० या वेळेत शारदा विद्यामंदिर, लालचौकी, कल्याण (प.) येथे होणार आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी शनिवार, १८ ऑक्टोबरला दुपारी ३ ते ६ या वेळेतच रांगोळी काढून पूर्ण करायची आहे. रांगोळी, रंग आणि साहित्य स्वतः आणायचे आहेत. रांगोळी स्वतःच्या हातानेच काढायची आहे. कोणत्याही ठशाचा किंवा छायेचा वापर स्पर्धकाला करता येणार नाही. रांगोळीचे क्षेत्रफळ ४ बाय ४ चौरस फूट असणार आहे. विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल, तर सर्व सहभागींनाही प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल, असे आयोजकांनी कळविले आहे.

नाव नोंदणीसाठी व अधिक माहिती संपर्कासाठी :
· यश महाजन : 9930571257/·
अर्जुन पाटील : 9820594975

# परिवर्तनाच्या लाटेत राकापाची महत्त्वाची भूमिका - प्रमोद हिंदुराव

## कार्याध्यक्ष डी. मोहन यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटनप्रसंगी सुतोवाच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**अंबरनाथ** : महाराष्ट्रातील महायुतीत असलेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जातोय. या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मोठ्या प्रमाणात ताकद दाखवेल आणि महाराष्ट्राच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावेल असे सुतोवाच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी केले. अंबरनाथचे राकांपा कार्याध्यक्ष डी मोहन यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. तर माजी खासदार आणि प्रदेश सरचिटणीस आनंद परांजपे यांनी अंबरनाथ मधील कार्यकर्त्यां सोबत पक्ष संपूर्ण ताकतीनिशी उभा राहील असे आश्वासन दिले.

अंबरनाथ पूर्वेकडील महात्मा फुले नगर येथे नवनियुक्त अंबरनाथ कार्याध्यक्ष डी मोहन यांच्या कार्यालयाचे उद्घाटन आनंद परांजपे व प्रमोद हिंदूराव यांच्या हस्ते करण्यात आले. या जनसंपर्क कार्यालयातून गोरगरिबांची पक्षाच्या माध्यमातून निरंतर जनसेवा होईल हा विश्वास डी मोहन यांनी व्यक्त केला आहे. याप्रसंगी महिलांचा मेळावा देखील आयोजित करण्यात आला होता. यात नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटातून अजित पवार गटात आलेल्या माजी नगरसेवक आणि शहराध्यक्ष सदामामा पाटील व कार्याध्यक्ष डी.मोहन यांचा मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

नवनियुक्त सदा मामा पाटील यांनी अंबरनाथ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ताकतीने लढेल आणि अधिकाधिक संख्या बळ गाठून पक्ष बळकट करेल असा विश्वासही व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भरत गोंधळी, सामाजिक न्याय विभाग ठाणे जिल्हा अध्यक्ष कमलाकर सूर्यवंशी, राष्ट्रवादी नेते किसन तारमाळे , प्रवीण खरात, रवींद्र परसुले, कल्पना तारमाळे, युवा जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, माजी महिला शहराध्यक्ष पूनम शेलार, माजी नगरसेवक सचिन पाटील आदी उपस्थित होते.

# सोबती संस्थेच्या वतीने आमटेम शाळेत शैक्षणिक साहित्य व फराळ भेट



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमटेम येथे सोबती संस्थेतर्फे ॲड. बापूसाहेब नेने ॲड. मंगेश नेने व त्यांच्या सहकार्याने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दिवाळीपूर्वी फराळ व शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्या जीवनात गोडवा निर्माण केला.

शालेय विद्यार्थ्यांना ज्या वस्तू दिल्या त्यामध्ये खोबरेल तेल टूथपेस्ट अंगाचा साबण कपड्यांचा साबण फेस पावडर खोड रबर शार्पनर बॉलपेन पेन्सिल स्केल छत्री कंगवा टिकली चाप व फरसाण व शंकरपाळे अशा विविध शाळा उपयोगी व घर उपयोगी वस्तू वाटप गेले अनेक वर्ष ही संस्था करत आहे.

प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याविषयी विशेष माहिती सहकारी शिक्षक महेंद्र पाटील यांनी दिली या कार्यक्रम प्रसंगी मुख्याध्यापिका वावेकर मॅडम नंदिनी पाटील शिक्षक वृंद तसेच पालक वर्ग आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.शेवटी सर्वांचे आभार मानले.

# वासिंद जि. प. शाळेत साडी, मिठाई, दिवाळी पदार्थ व शैक्षणिक साहित्य वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा, कांदळी या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि विद्यार्थ्यांच्या आईला साडी, मिठाई व संपूर्ण दिवाळी पदार्थ साहित्य किट असे वाटप करुन आनंदाची दिवाळी साजरी करण्यात आली.

रोटरी क्लब ऑफ कल्याण, टायगर्स आणि वरद फाऊंडेशन व अर्पण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा दिवाळी कार्यक्रम पार पडला. यासाठी साने गुरुजी समाजसेवी शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रशांत भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले.

याकार्यक्रमावेळी रोटरी क्लचे अध्यक्ष भुषण कोठावणे, सचिव दक्षता रानडे, कोषाध्यक्ष विनय हेडाऊ, सरपंच नम्रता जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रगती दळवी आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. शाळेचे सहशिक्षक अशोक गायकवाड यांनी सर्वांचे शाल व गुलाब पुष्प देऊन यथोचित स्वागत केले.

# शालेय विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास पुस्तिकेचे वाटप


दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना दिनांक 16 ऑक्टोबर पासून दिवाळीची सुट्टी असल्याने दिवाळीच्या सुट्टी मध्ये मुलांच्या अभ्यासात खंड पडू नये म्हणून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नळेफोडी माणगाव जिल्हा रायगड येथे सर्व मुलांना दिवाळी अभ्यास पुस्तिका संचाचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहिली ते पाचवी च्या मुलांना सर्व विषयाचा अभ्यास या पुस्तकाच्या माध्यमातून होईल असा आशावाद शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.भावे यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक अनिल नाचपल्ले शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश धोंडू भावे, हरिश्चंद्र गौरू महादे,नरेश नथुराम तुपट, सलोनी संतोष लोंखडे,अन्विशा अविनाश तुपट, करिना महादेव भुवड, सुचिता जयवंत महादे, अंगणवाडी ताई ,सर्व शाळा व्यवस्थापन समिती चे सदस्य व पालक, विद्यार्थी उपस्थित होते.



नळेफोडी शाळेचा स्तुत्य उपक्रम

# ग्रामीण भागातील शिक्षक 'रोटरी नेशन बिल्डर्स' पुरस्काराने सन्मानित




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या वतीने ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये कार्यरत १५ प्रतिभावान शिक्षकांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्रदान करून गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या परिश्रमासाठी हा सन्मान देण्यात आला.

या समारंभाचे आयोजन बालक मंदिर संस्थेच्या सभागृहात नुकतेच करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त मुख्याध्यापक व क्रीडा क्षेत्रात सुप्रसिद्ध असलेले अंकुर आहेर यांची उपस्थिती लाभली. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष धीरेन्द्र सिंह, सचिव नामदेव चौधरी व लिटरसी डायरेक्टर नमिता भिडे यांनी हा पुरस्कार शिक्षकांच्या निष्ठा, समर्पण, आणि समाजनिर्मितीतील मौल्यवान योगदानाचा सन्मान आहे असे याप्रसंगी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या आयुष्याला हक्काची दिशा देणाऱ्या या शिक्षकांमध्ये हा पुरस्कार खूप प्रेरणादायी ठरला आहे. प्रकल्प संयोजक सुखदा देशपांडे व सह संयोजक मनोहर भामरे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र गतका संघाची दिल्लीत उत्तम कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गतका फेडरेशन ऑफ इंडिया ने दिल्लीमध्ये 10 ते 12 ऑक्टोंबर 2025 दरम्यान आयोजित केलेल्या नवव्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाने चार रजत पदक आणि सहा कांस्यपदक पटकावले. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारतातील 23 राज्यातील 1000 हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

U-11 रजत पदक फरीसोटी मुलांच्या संघात निहार घनसोलकर (ठाणे जिल्हा), विनय गोसावी (पुणे शहर), मानस शेवाळे, मयंक चव्हाण, U-14 कास्यपदक सिंगल सोटी संघात (पुणे ग्रामीण) शुभ्रा चौधरी, मोक्षा गुंजाळ, श्रुती शेरकर, शर्वरी तारू, इंडिव्हिज्युअल सिंगल सोटी मध्ये काव्या शेळके (पुणे शहर), U-17 श्रावणी चौधरी (पुणे ग्रामीण), स्मित चौधरी आणि मानसी पवार यांनी या संघाचे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. तसेच अथर्व नलावडे, धीरज कोट, मंथन पवार, रवींद्र बनगया, श्रीधर कमले, कोमल शिंदे यांनी प्रशिक्षक पदाची जबाबदारी पार पाडली.या सर्व संघाचे दिल्ली येथे नेतृत्व असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्राचे सचिव प्राध्यापक आरती चौधरी यांनी केले व महाराष्ट्र संघासाठी पदक जिंकण्यास मुलांचे प्रोत्साहन वाढविले. असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्राचे अध्यक्ष संतोष चौधरी, उपाध्यक्ष अश्विनी महांगडे, खजिनदार एड. सायली जाधव आणि सर्व सभासद यांनी सर्व संघाला शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीस प्रोत्साहन दिले.



## भिवंडीत रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात मोटरसायकल स्वाराचा मृत्यू...

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : मुंबई उच्च न्यायालयाने खराब रस्ते व खड्डे या संदर्भातराज्यातीलसर्वमहापालिकाप्रशासनाचेकामासंदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. खराब व खड्डेमय रस्ते तातडीने दुरूस्तकरायाबाबतसुचनादिल्याआहेतअसेअसतानासुध्दा प्रशासनाकडूनदुर्लक्षहोतअसल्यानेवाहतूककोंडीवअपघात सारख्याघटनाघडतआहेत.भिवंडीतरस्त्यावरपडलेल्याखड्ड्यांनी पुन्हाएकदातरुणाचाअपघातीमृत्यूझाल्याचीखळबळजनक घटना उघडकीस आली आहे.पोलिसांनी या अपघात प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.भिवंडी कल्याण महामार्गावरील टेमघर परिसरात साईबाबा मंदिराजवळ खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातातराजनिरंजनसिंग(१९)यातरुणाचाजखमीअवस्थेत उपचारापूर्वीचजागीचमृत्यूझालारस्त्यांवरीलकॉंक्रीटवपेवर ब्लॉकमधीलउंचसखलरस्तातसेचरस्त्यावरीलखड्ड्यांमुळेहा अपघातघडल्याचीमाहितीनागरिकांकडूनदिलीजातआहे.राज हायुवकआपल्यामित्रासोबतदुचाकीवरूनबुधवारीमध्यरात्रीच्या सुमारासघरीजातअसतानाअचानकरस्त्यावरीलखड्ड्यामुळे दुचाकी घसरली. दोघेही रस्त्यावर कोसळले आणि त्याच वेळी मागून येणाऱ्या एका कंटेनरने राजला चिरडले. क्षणभरात सर्व काही संपले. काही क्षणांपूर्वी हसत खेळत घरी जाणारा तरुण क्षणातमृतदेहझाला.राजहाआपल्याकुटुंबातीलएकुलताएक मुलगाहोता.राजहाबी.कॉमचाविद्यार्थी,अभ्यासूआणिआयुष्या बद्दलमोठीस्वप्नंबाळगणाराहोता.त्याच्याअचानकझालेल्या मृत्यूमुळेकुटुंबीयांवरआभाळकोसळलेआहे.याअपघातीमृत्यूने परिसरातशोककळपसरलीअसूनमित्रमंडळीआणिनागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आहेत.या अपघाता संदर्भात शांतीनगर पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## "पोषण भी पढ़ाई भी" प्रशिक्षणाला ठाणे जिल्ह्यात उत्साहपूर्ण प्रतिसाद

### ३३८१ अंगणवाडी सेविका प्रशिक्षणात सहभागी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महिला व बालविकास विभागांतर्गत "पोषण भी पढ़ाई भी" या राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला ठाणे जिल्ह्यात उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळत आहे. या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी सेविकांना बाल पोषण, आरोग्य, शिक्षण आणि सर्वांगीण बालविकास विषयक सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी दि. ६ ऑक्टोबर २०२५ ते १५ डिसेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला असून, एकूण ३३८१ अंगणवाडी सेविका या प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

**ठाणे जिल्ह्याचे प्रशिक्षण नियोजन**

ठाणे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या १७ एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) प्रकल्पांतील सर्व अंगणवाडी सेविकांसाठी हे प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे नियोजन प्रती बॅच १०० (जास्तीत जास्त १०५) सेविका या प्रमाणे केले असून, प्रत्येक बॅचमध्ये पोषण, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व बालसुरक्षा यांसारख्या विषयांवर सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक मार्गदर्शन दिले जात आहे.

**प्रशिक्षणाचे उद्दिष्ट**

"पोषण भी पढ़ाई भी" या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे —

• अंगणवाडी सेविकांना बाल पोषण, आरोग्य, स्वच्छता आणि शैक्षणिक क्रियाकलापांवरील अद्ययावत माहिती व कौशल्य देणे,
• शालेयपूर्व शिक्षणासह बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सेविकांची कार्यक्षमता वाढविणे,
• आणि ग्रामीण व शहरी बालकांना अधिक गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी अंगणवाडी प्रणाली सशक्त करणे.

**प्रशिक्षणाचे आयोजन**

प्रशिक्षणाचे आयोजन ठाणे जिल्हा परिषदेतर्फे संबंधित प्रकल्प अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी आणि मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्था यांच्या समन्वयातून करण्यात आले आहे. प्रशिक्षण स्थळी सेविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, विषयतज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन केले जात आहे.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास), जिल्हा परिषद ठाणे संजय बागुल यांनी सांगितले की, "पोषण भी पढ़ाई भी प्रशिक्षण सध्या ठाणे जिल्ह्यात यशस्वीपणे सुरू आहे. अंगणवाडी सेविकांना नवीन कौशल्ये व कार्यपद्धतींचे प्रशिक्षण देऊन त्यांना अधिक सक्षमी केले जात आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे."

"पोषण भी पढ़ाई भी" प्रशिक्षण कार्यक्रमामुळे ठाणे जिल्ह्यातील बालविकास आणि शिक्षण क्षेत्रात नवीन उर्जा निर्माण झाली आहे. महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद ठाणे या माध्यमातून अंगणवाडी सेविकांचे सक्षमीकरण, गुणवत्तापूर्ण सेवा आणि बालकांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

## माणूसकीच्या भिंतीचा समाजातील गरजू घटकांना मोठा आधार

### - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : माणूसकीची भिंत आणि निरुपयोगी वस्तु संकलन, या उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळेल, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सहयोग सामाजिक संस्था आणि रोटरी क्लब ऑफ टाइगर यांच्या संयुक्त प्रयत्नातून "माणूसकीची भिंत" व "निरुपयोगी वस्तु संकलन" या उपक्रमांचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी बोलताना महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी हे प्रतिपादन केले. तसेच महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात अशा प्रकारे माणुसकीची भिंत उभारावी अश्या सुचना महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी ड प्रभागाचे सहा.आयुक्त उमेश यमगर, जे प्रभागाच्या सहा. आयुक्त सविता हिले, रोटरी क्लब ऑफ टाइगरचे अध्यक्ष भुषण कोठावदे, सहयोग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, जाणीव सामाजिक संस्थेच्या अनिता पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागरीकांना त्यांच्या वापरात नसलेल्या वस्तु समाजातील गरजूंपर्यंत पोहचविण्याची एक सामाजिक चळवळ सुरु झाली आहे. नागरीकांनी मोठ्या प्रमाणात यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा सहयोग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.

## भाऊसाहेब नेने महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण-रायगड मध्ये हिंदी विभाग, मराठी विभाग आणि डी.एल.एल.ई युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'वाचू आनंदे'उपक्रमाचे तसेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन ग्रंथालयाच्या वाचन कक्षात करण्यात आले होते.

यावेळी वाचन कक्षात विद्यार्थ्यांसाठी विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.सदानंद धारप,हिंदी विभाग प्रमुख व डी.एल.एल.ई युनिटचे जिल्हा समन्वयक डॉ.देवीदास बामणे ग्रंथपाल जी.जी.जोशी ,प्रा सुप्रिया धुमाळ व विविध शाखांचे मान्यवर प्राध्यापक आणि विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी उपस्थितांन वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा देत वाचन हे ज्ञानार्जनाचे साधन असून वाचन आपल्याला आचार-विचारांनी समृद्ध करते,अशा शब्दांत वाचनाचे महत्व विशद केले. प्राचार्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाच्या विविधांगी स्वरूपाची माहिती देऊन वाचनाच्या कक्षा रुंदावत त्यातून व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचे आवाहन केले. यानंतर हिंदी विभाग प्रमुख डॉ.देवीदास बामणे यांनी 'वाचनाचे महत्व' उद्धृत करणारी कविता सादर केली.तसेच डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगुन विविधांगी वाचन करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. यानंतर विद्यार्थ्यांनी वाचन कक्षात बसून आपल्या आवडत्या पुस्तकाचे वाचन केले.नंतर अभिवाचन स्पर्धा पार पडली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगणारी एक चित्रफीत दाखविण्यात आली. यानंतर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.सदर कार्यक्रमासाठी ७०-८० विद्यार्थी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ.अस्मिता पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.राधिका गोंधळी यांनी केले.

## मुरबाड पोलीस स्टेशनच्या वतीने सायबर जनजागृती व नशामुक्ती मार्गदर्शन शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड**:ठाणे ग्रामीण पोलिस दल उपविभागीय पोलिस अधिकारी विभाग मुरबाड व मुरबाड पोलिस ठाणे अंतर्गत मुरबाड न्यू इंग्लिश स्कूल मध्ये आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर जनजागृती अभियान तसेच नशामुक्ती मार्गदर्शन मार्गदर्शन करण्यात आले.

सध्या तरुण पिढीला सोशल मिडियाचे आकर्षण असून प्रत्येक विद्यार्थ्यांकडे मोबाईल आहेत. मात्र विद्यार्थी मोबाईल अथवा कॉम्पुटर याचे कुठलेही प्रशिक्षण न घेता गुगल, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्ट्राग्राम, यासारखे सोशल मीडिया ची साधने वापरता यात आपली वैयक्तीक माहिती अपलोड करून आपली वैयक्तीक माहिती या अँप च्या माध्यमातून शेअर करतात यातूनच काही सायबर हॅकर क्राइम घडवून आणतात त्यामुळे आपल्या बाबत काही अगणित घडत असल्याचे समजले तर 1930 क्रमांकावर किंवा सायबर.com च्या अधिकृत वेबसाइट वर 24 तासाच्या आत फॉर्म भरून तक्रार करणे गरजेचे आहे. जेणे करून पोलिसांना तपास करणे सोपे जाते, विद्यार्थ्यांना नशेच्या जाळयात ओढून किंवा नव्या ए आय ॲप मुळे ब्लॅक मेल करून आर्थिक लूट केली जात आहे

याबाबत पोलिस अधीक्षक ठाणे डी एस स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली, मुरबाड उपविभागीय अधिकारी अनिल लाड यांनी विद्यार्थ्यांना याबाबत मार्गदर्शन करून सायबर, गुन्हे किंवा सोशल मिडिया मुळे निर्माण होणारे धोके कसे टाळाल याची माहिती दिली त्याच प्रमाणे, मुरबाड पोलिस निरीक्षक दादासाहेब एडके , संस्थेचे पदाधिकारी मोहनीश तेलवणे ,मुख्याध्यापक पाडवी, जयवंत कराळे,बडगुजर सर व शाळेय विद्यार्थी उपस्थित होते.

पोलिसांना सध्या थेट दरोड्या विषयी जेवढी गांभीर्य नसून सायबर दरोड्याची भीती किंवा आव्हान असल्याचे यावेळी सांगण्यात आले , त्यामुळे विद्यार्थ्यांनी कुठलेही अॅप वर वैयक्तिक माहिती देताना ती सुरक्षित कशी राहिल याकडे लक्ष देण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

## खर्डी जीवनदीप महाविद्यालय सेवा योजनेतर्फे काष्टी गावात दिवाळी फराळ वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**खर्डी** : दिनांक. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जिल्हा परिषद शाळा काष्टी येथील विद्यार्थ्यांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा देऊन फराळ वाटप करण्यात आले. सदर उपक्रमास स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यां सोबत गप्पा गोष्टी करून त्यांना दिवाळी सणाचे महत्व सांगितले त्याचबरोबर शाळेतील विद्यार्थ्यांनी फराळाचा मनसोक्त आस्वाद घेत दिवाळी सण साजरा केला.

या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सोनावणे आणि प्रा. रसिका सकपाळ उपस्थित होते. सदर उपक्रम संस्थेचे अध्यक्ष मा. रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयाचे प्राचार्य. कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाने पार पडला.

## 'विद्यार्थी' असणे ही शिक्षक असण्याची पहिली अट - विलासराव देशमुख

### मुख्याध्यापक श्री.शरद उद्धवराव जंगाले सरांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अक्कलकोट** : माणसांचं मोठेपण तो किती मोठा झाला यापेक्षा त्याने किती लोकांना मोठे केले यावर त्यांचे मोठेपण मोजले जाते.शिक्षण देणे हे आपल्या जीवनाचे ध्येय आहे आणि ज्ञानदानाचे समर्पण करणे हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे मनोमन स्वीकारलेल्या जंगाले गुरुजींच्या शैक्षणिक सेवा कार्याची महानता भावी पिढीला आदर्शवत अन प्रेरणादायी ठरेल अशीच आहे. शिक्षण हे संस्कृती संवर्धनाचे साधन आहे, तर शिक्षक हा संस्कृतीचा साधक आहे. ही वृत्ती सरांनी आयुष्यभर जोपासली त्याचा मी गेल्या चार दशकांचा साक्षीदार आहे असे उदगार मराठा मंदिर या संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी काढले. मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मला राजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे मुख्याध्यापक श्री.शरद उद्धवराव जंगाले सरांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. मोठया संख्येने उपस्थित असलेल्या नागरिक आणि शिक्षकांसमोर जग आणि आधुनिक शिक्षण पद्धती झपाट्याने बदलत असल्याचे मत मांडताना ते आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की, विद्यार्थी जसा निव्वळ परीक्षार्थी असता कामा नये तसा, शिक्षकही निव्वळ 'अर्थार्जनाचे' साधन म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहाणारा असता कामा नये. 'शिक्षक' असण्याची पहिली अट 'विद्यार्थी' असणे हीच आहे. झपाट्याने बदलणाऱ्या काळात सतत अद्ययावत राहणे हे शिक्षकांसाठी देखील गरजेचे बनले आहे. आज शिक्षणाचे अवमुल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. आमच्यावेळी हे कॉम्प्युटर - मोबाईल नव्हते पण मान मर्यादा आणि पावित्र्य होते. आजचा विद्यार्थी संगणकीय तंत्रज्ञान सहज साध्य करून देशापरदेशात अधिक उच्च पदावर पोहोचत आहे. मात्र गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना सध्या लोप पावत आहे. आपल्या मराठा मंदिरच्या मुंबई, अक्कलकोट, जत, पाली, रत्नागिरी येथील सर्व संस्थामधील संस्थाचालक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी परस्परांना पूरक अशी सामंजस्याची भूमिका घेत यशस्वी वाटचाल करीत आहोत त्याचे दृश्य परिणाम दिसत असल्यामुळे उत्तरोत्तर प्रगती होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे अध्यक्ष योगेश शशिकांत पवार हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून



विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष संतोषजी नलावडे, चिटणीस मनोहर साळवी, म.मं. श्री. शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक सुरेश फडतरे, विद्यमान मुख्याध्यापक राजेश पडवळकर, म.मं. श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक मानसिंग ल. बनसोडे, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, मुंबईचे उद्योजक ॲड. यश घोसाळकर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभयजी खोबरे, शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक बी. जी. शिंदेआदी मान्यवर उपस्थित होते. जांगळेसरांवर प्रेम करणाऱ्या अनेकांनी याप्रसंगी त्यांच्या कार्याला उजाळा दिला आणि निवृत्ती नंतरच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमावर 'विद्वान सर्वत्र पूज्यते' असा भाव दिसून येत होता. सत्काराला उत्तर देताना जंगाले सर भावुक शब्दात म्हणाले, शाळेशी माझ्या सोनेरी आठवणी जोडलेल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीसाठी, त्याचा पहिला कामाचा अनुभव खूप मौल्यवान असतो. या शाळेने मला शिक्षक म्हणून शिकवण्याची पहिली संधी दिली. त्यावेळी मी नवीन होतो आणि अनुभव नव्हता. पण त्यावेळच्या आमच्या संस्थाचालकांनी आणि मुख्याध्यापकांनी मला नेहमीच साथ दिली. मुलांना नीट कसे शिकवायचे, कमकुवत मुलांना वाचन आणि लेखन कसे शिकवायचे या सर्व महत्त्वाच्या गोष्टी मला सांगितल्या. येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मला नेहमीच भरभरून प्रेम दिले. हे सर्व विद्यार्थी माझे विद्यार्थी नसून माझ्याच मुलांसारखे होते. त्यांना नवीन कौशल्ये शिकवली, त्यांना त्यांचे सर्व ज्ञान निरपेक्षपेपणे देण्याचा आणि उत्तम शिक्षण देण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला. गेल्या काही वर्षात तर मराठा मंदिर विद्यावर्धिनी कमिटीच्या वतीने सर्वांनी फार प्रेम दिले आपुलकी दिली. आम्हाला त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. आम्हाला अधिक शिस्तीने मेहनत करण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शंभुराजे गाटे सर, सौ.अर्चना जाधव मॅडम, तर आभार प्रदर्शन सौ.स्मिता जगदाळे मॅडम यांनी केले.का र्यक्रम आयोजन करण्यात आणि यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री मानसिंग बनसोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.मनिषा मोरे मॅडम, सौ.प्रमिला पाटील मॅडम, सौ.रेखा चव्हाण मॅडम, सौ.मनिषा तेलगावकर मॅडम, श्री.शहाजी सावंत सर, श्री.विक्रांत गोडसे सर, शिक्षकेतर कर्मचारी श्री.राजेंद्र गोंडाळ, श्रीमती. शारदा साळुंके यांनी विशेष मेहनत घेतली.




## रायगडात अट्रॉसिटी गुन्ह्यांचे प्रमाण अत्यल्प - गोरक्ष लोखंडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/**रायगड** : रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये (अट्रॉसिटी) गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले असून जिल्ह्यात चालू वर्षात सप्टेंबर महिन्यापर्यंत या कायद्यान्वये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या वर्षात एकूण 31 गुन्हे नोंदविले गेले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांनी सक्षमपणे काम करावे. महाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत 2024 साली घडलेल्या प्रकरणात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक करावी, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी (दि.14 ऑक्टोबर ) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत दिली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, सहाय्यक समाजकल्याण आयुक्त सुनील जाधव उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदा, नगरपालिका, नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांसाठीच्या विविध योजना, नोकरभारती, अनुकंपा तत्वावरील प्रकरणे, समाजकल्याण विभागाकडून येणाऱ्या निधीचा वापर, आर्थिक दुर्बल घटकांवर होणारा खर्च, दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, लाड पागे प्रलंबित प्रकरणे याबाबत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी यांच्याकडून आढावा घेतला. रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले आहे चालू वर्षात नऊ महिन्यांमध्ये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहे. 1995 ते 2025 या कालावधीत जिल्ह्यात 789 गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती या वेळी देण्यात आली.मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी रायगड जिल्ह्यात चांगल्या प्रकारे केली जात आहेत. समाजकल्याण विभागाचा निधीचा वापरदेखील योग्य प्रकारे केला जात आहे.राज्यातील 26 जिल्ह्यांचा आढावा घेतला असून रायगड हा 27 वा जिल्हा आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड जिल्ह्याची कामगिरी समाधानकारक असून सर्व योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जात आहेत, असेही श्री.गोरक्ष लोखंडे यांनी यावेळी सांगितले.




*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*